**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास, वाटचाल, संधी आणि आव्हाने

**सानिध्य धनराज तायडे[1], ऊषा एन. पाटील[2]**
*[1]संशोधक विद्यार्थी*
*[2]मार्गदर्शक*
*Corresponding Author – सानिध्य धनराज तायडे*
**DOI - 10.5281/zenodo.15250558**

**सारांश:**

*प्रचिन काळापासून भारतीय अर्थव्यवस्था व व्यापार ते खुले होते भारताने प्राचिन काळापासून मसाल्याचे पदार्थ,कापड, यांची मोठया प्रमाणात निर्यात केली तसेच भारताने श्रीलंका,चीन, म्यानमार या देशांनसोबत व्यापाराबरोबर धार्मिक संस्कृतीक देवाणघेवाण केली.*

*तसेच हे व्यापार सिंधु संस्कृती,बुध्दकाळ, मौर्य,काळ, गुप्तकाळ,मध्ये व्यापाराचे महत्व व विदेशी व्यापारी, संशोधक, विद्यार्थी यांची देवाण-घेवाण झाली तसेच या काळामध्ये भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला विद्यापिठात अभ्यासाठी हे विदेशी लोक येत.*

*यानंतर अरब, अफगान,ईरानी या नंतर मुघल आक्रमकांनी भारतावर आक्रमण केले व सामराज्य निर्माण केले यांनतर ब्रिटीशांनी भारतात शासन केले व भारतीय समाज व अर्थव्यवस्थेत बदल घडवून आले.*

***सुचनक शब्द (key words) – व्यापार, खुले अर्थव्यवस्था,स्थानिक उद्योग, रोजगार निर्मिती, शिक्षण, युध्द.***

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था हे प्राचीन काळापासून व्यापाराला व उद्योगाला मोठ्या प्रमाणात चालना दिली.

1) विदेशातील अनेक व्यापारी भारतात व्यापारासाठी लोक येत होते.
2) विदेशात भारतीय वस्तुला मोठ्या प्रमाणात मागणी होती.
3) विदेशातील विद्यार्थी भारतामध्ये शिक्षणासाठी व संशोधनासाठी येत होते.

9 शतकापर्यंत भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थीक व सामाजिक भरभराट होते परंतु त्यानंतर भारतावर मोठ्या प्रमाणात ईराण, अफगाण, आक्रमकांनी आक्रमण केले व भारतात त्यांचे सामराज्य निर्माण केले व त्यानंतर मुघल आक्रमकांनी 14 व्या शतकापासून ते 18 व्या शतकापर्यंत भारतात राज्य केले त्यानंतर 1947 मध्ये स्वातंत्र्य प्राप्त झाले त्यावेळी भारताने साम्यवाद व भांडवलवाद यांची समिश्र धोरण अवलंबले हे धोरण 1947 पासून ते 1991 पर्यंत लागू होते. या काळात भारताने आपल्या अर्थव्यवस्था विदेशी कंपनी बंद केली होती या काळात भारताने देशा अंतर्गत स्थानिक उद्योगांना चालना दिली व त्यांना आर्थीक प्रोत्साहन केले.

या काळात भारतामध्ये टाटा समुह व बजाज व रिलायन्स या उद्योगांची मोठ्या प्रमाणात वाढ व विकास झाला यामुळे स्थानिक उद्योगांना मोठ्या प्रमाणात प्रोत्सहान मिळाले व किरलोस्कर समुहाची वाढ झाली व मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. या काळात टाटा समुहाने स्वत:ची कार, ट्रक यांची निर्मितीवर भर दिला तसेच बजाज समुहाने स्कुटर व

बाईक निर्मितीवर भर दिले यामुळे स्थनिक उद्योगांची मोठ्या प्रमाणात विकास झाला व त्यांनी स्वत:ला आर्थिक दृष्या सक्षम केले यातुन त्यांनी स्वत:ला जागतिक स्पर्धेसाठी व आव्हानासाठी सक्षम बनविले. त्याचाच परिणाम म्हणुन भारताने 1991 ला जागतिकीकरण, उदारीकरण, व खाजगीकरणाचे धोरण आत्मसात केले. त्यांनतर विदेशातील अनेक उद्योग समुहांनी भातरतामध्ये स्वत:च्या कार्यालय निर्माण केले यातून भारतीय युवकांना रोजगार व तांत्रिक शिक्षणाच्या नविन संधी निर्माण झाल्या सोबतच भारतातील अनेक उद्योगांनी विदेशातील कंपन्यासोबत संधी केल्या तर काही विदेशी कंपन्या भारतीय कंपण्यामध्ये शामिल झाल्या यातुन भारताच्या आर्थीक विकासाला चालना मिळते यातच भारतातील आयडीया या मोबाईल सिम कंपनीने ओव्हडाफोन कंपनी सोबत संधीि केली.

**संभाव्यता (Prospect):**

1) देशात मोठ्या प्रमाणात आर्थीक गुतंवणुक होणे आवश्यक आहे व त्यांतुनच रोजगारच्या संधी निर्माण होते व आर्थीक विषमता कमी होणास मदत होईल.
2) देशात आज 2 ते 3% लोकांनकडे देशातील 55 ते 60% मालमत्ता आहे तर उर्वरित लोकांनकडील देशातील 45 ते 40% मालमत्ता आहे. तर यातुन देशातील आर्थीक विषमतेचे प्रमाण लक्षात येते तर ते मिटवणे अत्यंत आवश्यक आहे
3) देशात उत्तर व दक्षिण भारतात मायक्रोसॉफ्टला, अमॉझोन या कंपनीचे कार्यालय निर्माण करण्यात आले आहे यात अनेक भारतीय युवकांना रोजगारच्या संधी उपलब्ध् आहे त्याचप्रमाणे भारतात ॲपल कंपनीचे मोबईल व आयपॅड निर्माण केली जातात.
4) तसेच भारतात टाटा, इन्फेसिस , बजाज, रिलायंन्स यांनी देशातील अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थीक गुतंवणुक केली आहे तसेच त्यांचे सोलर पॅनल कार, विज निर्मीती कारखाने भारतात अनेक ठिकाणी आढळतात.
5) देशात Startup ला मोठ्या प्रमाणात चालना देणे आवश्यक आहे व त्यासाठी आर्थीक पाठबळ देखील द्यावे यासाठी सरकारने 2016-17 मध्ये

Startup India नावाची योजना निर्माण केली यातुन अनेक Startup निर्माण झाले व आज ते Unicorn झाले आहेत त्यामुळे भारतीय युवक हे रोजगार निर्माण करणारे उद्योगक बनु शकतात हे भारतीयांना समजले आहे.

यातुन देशातील जे सर्वात मोठी समस्या आहे आर्थीक विषमता व बेरोजगार यांना आपण आव्हान देवू शकतो.

1) देशातील बजेटमध्ये रोजगार निर्मातीसाठी योग्यत्या योजनांची निर्माती करणे.
2) देशात आयातीचे प्रमाण वाढविणे यामध्ये मायक्रोचिप उद्योगाला प्रोत्साहण देणे आवश्यक आहे व देशाची आयात कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न करणे ज्यामुळे Balance of Payment मधील तुट कमीत कमी करण्याचा हा प्रयत्न आहे.

**आव्हाने :**

1) देशातील निर्यातील मोठ्या प्रमाणात चालना देण्याचा प्रयत्न करणे Balance of Payment नियंत्रणात ठेवणे.
2) देशावर वाढत चालेले कर्ज, / आर्थिक ओझे यांना नियंत्रणात ठेवणे
3) देशातील शिक्षणाचा घटत चालेला स्तर व त्यामुळे बरोजगारांची समस्या
4) नॅशनल स्टॅाक ऐक्सचेंज व बॉंम्बेस्टॉक ऐक्सचेंज यांच्या निर्देशाकांत सतत होणारी घट व अमेरिका व चीन या देशांचे आर्थीक वर्तन
5) भारतीय रूपयाचे सतत कमजोर होणे आज 1 डॉलरची किंमत 85/- रूपये येवढी घटत आहे त्यामुळे त्याचा नकारत्मक परिणाम Balance of

Payment व Balance of Trade वर होत असतो

6) भारतीय बाजारपेठेवर रशिया व युक्रेन यांचे युध्द तसेच मिडल ईस्ट मधील ईस्त्राइल पॅलेस्टाईन यांचे युध्दाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम दिसून येतो त्याच बरोबर चीनच्या महत्वकांक्षी धोरणाचा भारत व आस पासच्या देशावर परिणाम दिसून येतो.

**निष्कर्ष :**

1) निर्यातीवर भर देणे आवश्यक आहे तसेच आयातीचे प्रमाण कमी करणे देखील आवश्यक आहे व जीवन आवश्यक वस्तुंच्या साठ्या निर्माण करणे
2) रोजगार निर्मीवर भर देणे
3) आसपासच्या देशांसोबत मैत्रीचे सबंध निर्माण करणे
4) अमेरिका चीन यांच्या आव्हाने योग्य उत्तर देणे
5) शिक्षण व आर्थीक सुधारणेवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे.
6) कृत्रिम बुध्दीमतासाठी भारतीय युवकांना तयार केले तसेच त्यांना संशोधन नव निर्माती यासाठी सतत प्रोत्साहन देतात.

**संदर्भग्रंथ :**


1) www.wikipedia.org
2) Data on Import and Export